महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,

अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 03 | एकुण गुण- 100 |
| विषय | - [A] राज्यघटना आणि मानवी हक्क [B] भारतीय पुरावा कायदा | वेळ - 1000 ते 1300 |
| दिनांक | - 16/01/2015 | वार- शुक्रवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :

अ. सर्व प्रश सोडविणे अनिवार्य आहे.

ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.

क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.

ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.

इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.

उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## भाग-अ : भारतीय पुरावा कायदा

गुण

**प्र.1 कलम व उदाहरणासह सविस्तर टिपा लिहा. [प्रत्येकी मर्यादा 100 शब्द]** 30

अ. मेमोरंडम पंचनामा व त्याचे पुराव्याच्या दृष्टीने महत्व.

ब. मृत्यूपूर्व जबाब व त्याचे पुराव्याच्या दृष्टीने महत्व.

क. ओळख परेड व त्याचे पुराव्याच्या दृष्टीने महत्व.

**प्र.2 भारतीय साक्षीपुरावा अधिनियमानुसार साक्षीदारांच्या साक्ष तपासणी करण्याबाबतचा क्रम, याबाबत थोडक्यात विवेचन करा. उलट तपासणीत कायदेशीर असलेले प्रश्न, याबाबत थोडक्यात लिहा. [100 शब्द]** 10

**प्र.3 अ. 'शाबितीची जबाबदारी' संज्ञा स्पष्ट करा. [50 शब्द]** 05

**ब. खालील प्रकरणांमध्ये शाबितीची जबाबदारी कोणावर आहे ते सांगा.** 05

[1] 'ख' ने जो गुन्हा केलेला आहे असे 'क' म्हणतो त्याबद्दल 'ख' ला शिक्षा करण्यात येत आहे असा न्यायनिर्णय दिला जावा असे 'क' न्यायालयाला आवाहन करतो. तर घडलेला गुन्हा कोणी शाबित केला पाहिजे?

[2] जी तथ्ये खरी असल्याचे 'क' प्रपादन करतो व 'ख' नाकबूल करतो, त्यामुळे 'क' हा न्यायालयाला, तो 'ख' च्या कब्जातील विवक्षित जमिनीला हक्कदार आहे असा न्यायनिर्णय देण्यास सांगतो. तर तथ्यांचे अस्तित्व कोणी शाबित केले पाहिजे?

[3] जी जमीन 'ख' च्या कब्जात असून 'क' च्या प्रपादनाप्रमाणे 'ख' चा बाप 'ग' याच्या मृत्यूपत्रान्वये 'क' ला देण्यात आली होती तिच्यासाठी 'क' हा 'ख' विरुध्द दावा करतो. जर कोणत्याही बाजूने काहीच पुरावा दिला गेला नाही तर 'ख' आपल्याकडे कब्जा ठेवून घेण्यास हक्कदार होईल. म्हणून शाबितीची जबाबदारी कोणावर आहे?

[4] बंधपत्रावरुन येणे असलेल्या पैशासाठी 'क' हा 'ख' वर दावा लावतो. बंधपत्राचे निष्पादन झाल्याचे कबूल करण्यात आले आहे, पण ते कपटाने मिळवले असे 'ख' म्हणतो व 'क' ते नाकबूल करतो. जर कोणत्याही बाजूने काहीच पुरावा दिला गेला नाही तर,'क' जिंकेल, कारण बंधपत्राबद्दल तंटा नाही व कपट शाबीत झालेले नाही. म्हणून शाबितीची जबाबदारी कोणावर आहे?

[5] 'क' हा 'ख' विरुध्द चोरीबद्दल खटला भरतो व आपण चोरी केल्याचे 'ख' ने 'ग' कडे कबूल केले यावर न्यायालयाने विश्वास ठेवावा असे आवाहन करतो. तर कोणी कबुली जबाब शाबित केला पाहिजे?

## भाग-ब : भारतीय राज्यघटना व मानवी हक्क

प्र.4 टिपा लिहा. [प्रत्येकी 100 शब्द] 30

अ] राज्यघटनेनुसार राज्य व्यवस्थेचे स्वरुप [ब] मुलभूत अधिकार [क] राज्य मानवी हक्क आयोग

**प्र.5 भारतीय राज्य घटनेच्या उद्देश पत्रिकेतील (Preamble) उद्दिष्टये (Objective) लिहा. [100 शब्द]** 10

**प्र.6 राष्ट्रीय महिला आयोगाची सविस्तर माहिती द्या. [100 शब्द]** 10

***